प्रेसनोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलढाणा |
| आरोपी लोकसेवक नाव व कार्यालय | श्री. कृष्णा लक्ष्मण जुंबडे वय ३५ वर्ष पद– वनरक्षक, हनवतखेड बीट, वनपरिक्षेत्र अधिकारी,( प्रादेशिक) कार्यालय, जळगांव जामोद जि.बुलढाणा वर्ग–३ रा. जांभरुन (आंध),पो.पुरोगांव ता.हिंगोली,जप्याफन अंधवाडी हिंगोली,महाराष्ट्र – ह.मु.प्रकाशनगर,जळगांव जामोद जि.बुलढाणा |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २५००/– रूपये |
| घटनास्थळ | न.पा.कॉम्पेलेक्सच्या पाठीमागील बाजू, जळगांव जामोद |
| घटना तारीख | दिनांक १४.०७.२०२१ |

**थोडक्यात हकीकत :–** यातील तक्रारदार यांचे रेतीने भरलेल्या ट्रॅक्टरवर कार्यवाही न करता सोडून देणेसाठी तसेच रेतीची वाहतूक सुरळीत चालु ठेवण्यासाठी जळगांव जामोद येथील श्री. कृष्णा लक्ष्मण जुंबडे, हनवतखेड बीटचे वनरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी,( प्रादेशिक) कार्यालय, जळगांव जामोद जि.बुलढाणा यांनी २५००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबतची तक्रार ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा घटका कडे नोंदविली होती.

सदर तक्रारी वरुन दिनांक १४.०७.२०२१ रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता आरोपी लोकसेवक श्री. कृष्णा लक्ष्मण जुंबडे पद– वनरक्षक, हनवतखेड बीट, वनपरिक्षेत्र अधिकारी, ( प्रादेशिक) जळगांव जामोद जि.बुलढाणा यांनी तक्रारदार यांचे रेतीने भरलेल्या ट्रॅक्टरवर कार्यवाही न करता सोडून देणेसाठी तसेच रेतीची वाहतूक सुरळीत चालु ठेवण्यासाठी पंच क्र.१ यांचे समक्ष २५००/–रु लाचेची मागणी केली. व लाच स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने आज दिनांक १४.०७.२०२१ रोजी रितसर सापळा कार्यवाही आयोजित केली असता नमुद आरोपी लोकसेवक यांनी २५००/– रु पंच क्र.१ यांचे समक्ष न.पा.कॉम्पेलेक्सच्या पाठीमागील बाजू, जळगांव जामोद येथे लाचेच्या रकमेचा स्विकार करुन स्वत:चा आर्थिक लाभ करुन घेवून लोकसेवक पदाला न शोभणारे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**सदर कार्यवाही :–**१. मा. श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री.अरुण सावंत, अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती
३. मा. श्री.संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा

यांचें मार्गदर्शना खाली सापळा अधिकारी श्रीमती ममता अफूने, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा.व सापळा पथकातील स्टाफ पोहेकॉ महादेव चव्हाण, नापोकॉ सुनिल राऊत पो.कॉ,जगदीश पवार,यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व ८८८८७६८२१८ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ या वर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा यांनी केले आहे

(श्रीमती ममता अफूने)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा

Scanned with CamScanner